जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune
Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

# दैनंदिन गुन्हयांची प्रेसनोट

## पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०६/०७/२०२३
## दि.०५/०७/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | येरवडा पो स्टे ४६४/२०२३,भादविक ३०७,३२३,५०४,५०६,३४,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | साहिल शेख,वय-१८ वर्षे,रा.इंदिरानगर,विश्रांतवाडी,पुणे |
| **आरोपीत** | अभिषेख ऊर्फ अभि रमेश तांबे,वय-२१ वर्षे,रा.लेन नं.८,मुंजाबा वस्ती,धानोरीटपुणे २.सुमित नागेश लंगडे, वय-२५ वर्षे,रा.इंदीरानगर,लोहगांव रोड,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०५/०७/२०२३ रोजी १२/०० वा. रोजी ५०९,चौक,लोहगाव,विश्रांतवाडी,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे त्यांचे राहते घरी जात असताना त्यांचे आत्याच्या मुलाचे भांडणाचा राग मनात धरून यातील नमुद इसमांनी संगनमत करून,फिर्यादी यांना थांबवुन त्यांना लाथा-बुक्यांनी मारहाण केली. तसेच फिर्यादी यांना जीवे ठार मारण्यासाठी,त्याचेकडील धारधार शस्त्राने फिर्यादी यांचे डोक्यात मारून त्यांना गंभीर जखमी केले आहे. |
| **त.अंमलदार** | पोलीस निरीक्षक,(गुन्हे), श्रीमती.कांचन जाधव ९९२२३४८८८० |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे २७३/२०२३,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | रामचंद्र कटरे,वय ३६ वर्षे,रा.सहयोगनगर,वारजे,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०३.०७.२०२३ सकाळी ०९/३०वा.ते दि.०४.०७.२०२३ रोजी सकाळी ०७/३० वा.चे दरम्यान ४६/२, पाण्याच्या टाकी जवळ,सहयोगनगर वारजे माळवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहता फ्लॅट कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,बेडरूम मधील कपाटातील १,३९,९००/- रूपये रोख रक्कम व सोन्या-चांदीचे दागिने असा एकुण २,३९,९००/- रूपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. पाटील ९०२८७८४३४३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | विमानतळ पो स्टे ३४४/२०२३,भादविक ३२३,३२४,५०४,३४,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेंन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | गणेश राठोड,वय-२१ वर्षे,रा.इंदीरानगर,लोहगाव,पुणे |
| **आरोपीत** | एक इसम व त्याचे इतर तीन साथीदार (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०७/२०२३ रोजी रात्री ११/३० वा.बर्मासेल येथील सरकारी दवाखान्या जवळ,लोहगाव,पुणे येथे सार्वजनिक ठिकाणी |

| | |
|---|---|
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे पार्सल जेवण घेवुन त्यांचे राहते घरी जात असतांना,सदर ठिकाणी त्यांचे मित्राशी बोलत असतांना,यातील नमुद इसमाने फिर्यादी यांना शिवीगाळ करून हाताने मारहान करून,लाकडी दांडक्याने पाठीवर व पायावर मारुन दुखापत केली. तसेच हातगाडीवर ठेवलेला लोखंडी शस्त्र काढुन तो हवेत फिरवुन,मी आज तुला सोडणार नाही,कोणात हिम्मत असेल तर समोर या असे असे मोठ-मोठ्याने ओरडुन दहशत केली. त्यानंतर फिर्यादी व त्यांचे मित्र यांना शिवीगाळ व हाताने,लाकडी दांडक्याने मारहाण करुन दुखापत केली आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. संदिप करपे ९९२३०९५५६६ |
| ४ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ५२५/२०२३,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | एक महिला,वय ६४ वर्षे,रा.दत्तनगर,लोणीकंद,पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०२/०७/२०२३ रोजी दुपारी १२/०० वा.ते दिनांक ०४/०७/२०२३ रोजी दुपारी १६/४५ वा.चे दरम्यान मौजे लोणीकंद,ता.हवेली जि.पुणे गावचे हद्दीत फिर्यादीचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचा राहते घर कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे राहते घराचे मुख्य दरवाजाचे कुलुप कशाचे तरी सहाय्याने उचकटुन,त्यावाटे आंत प्रवेश करून,घराचे वरच्या मजल्यावरील रूम मधील धान्याच्या कोठी मध्ये ठेवलेले रोख रक्कम व सोन्याचे दागिने असा एकुण ३,९५,०००/- रूपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, गजानन जाधव ९८२२७४२३३३ |
| ५ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | लोणीकंद पो स्टे ५३२/२०२३,भादविक ४५४,४५७,३८० |
| **फिर्यादी** | कुमार आव्हाळे,वय-३७ वर्षे,रा.आव्हाळवाडी,ता.हवेली,जि.पुणे |
| **आरोपीत** | अज्ञात |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दिनांक ०४/०७/२०२३ रोजी रात्री ०९/०० वा.ते दिनांक ०५/०७/२०२३ रोजी सकाळी १०/०० वा.चे दरम्यान केसनंद फाटा,वाघोली,ता.हवेली जि.पुणे या ठिकाणी असलेले सागर इलेक्ट्रीकल्स ऑण्ड हार्डवेअर नावाचे दुकानात |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे सागर इलेक्ट्रीकल्स ऑण्ड हार्डवेअर नावाचे दुकान असुन,त्यांचे दुकान कुलुप लावुन बंद असताना,कोणीतरी अज्ञात इसमाने त्यांचे दुकानाच्यावरील छताचे मागील बाजुचे पत्रा कशाच्यातरी साह्याने उचकडुन,त्यावाटे दुकाना मध्ये प्रवेश करून,दुकानातील काऊंटरचे दोन ड्रॉव्हर मधील ५,००,०००/- रूपये रोख रक्कम व दोन डी.व्ही.आर. असा एकुण ५,५०,०००/- रूपये किमतीचा ऐवज घरफोडी चोरी करून नेला. |
| **त.अंमलदार** | सहा.पोलीस निरीक्षक, गजानन जाधव ९८२२७४२३३३ |
| ६ | |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | मार्केटयार्ड पो स्टे १६१/२०२३,भादविक ३५३,३३२,३२३,५०४,५०६ |
| **फिर्यादी** | समीर चव्हाण, पोलीस अंमलदार, मार्केटयार्ड पो स्टे पुणे शहर |
| **आरोपीत** | गणेश भिमा शिंदे,वय-३१रा. प्रेमनगर वसाहत,मार्केटयार्ड,पुणे (अटक) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०४/०७/२०२३ रोजी ०२/५० वा. आशा पान टपरी शेजारी,निमंत्रण हॉटेल जवळ,बिबवेवाडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने सार्वजनीक रोडवर आरडा-ओरडा करुन,जाणा-या-येणा-या लोकांना शिवीगाळ करीत होता. त्यावेळी फिर्यादी हे सदर ठिकाणी त्याचेजवळ जावुन पोलीस असल्याचे सांगुन समजावुन सांगत असताना,त्याने फिर्यादी यांना अपशब्द वापरून,त्यांना धमकी देवुन,फिर्यादी यांचे छातीवर जोराने धक्का देवुन रोडच्या कडेला पडलेली काचेची टयुब उचलुन,फिर्यादी यांचे डोक्यात व डाव्या कानाच्या बाजुला मारुन जखमी करुन फिर्यादी हे कर्तव्यावर असताना,त्यांचे शासकीय कामात अडथळा निर्माण केला आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी.भोसले ९०११३७२००७ |
| १ | **<u>दि.०६/०७/२०२३ रोजी रात्रौ ००/०० वा. ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>** |
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वानवडी पो स्टे ३१६/२०२३,भादविक ३९९,४०२,महा.पो.का.क.३७(१)(३)१३५,आर्म ॲक्ट ४(२५),क्रिमीनल लॉ अमेन्डमेंट ॲक्ट क.३ व ७ |
| **फिर्यादी** | यतीन भोसले, पोलीस अंमलदार, वानवडी पोलीस स्टेशन,पुणे शहर |

| | |
|---|---|
| **आरोपीत** | १.प्रशांत शिवाजी तिकोटे,वय २२ वर्षे,रा.साईविहार कॉलनी,काळेपडळ,हडपसर,पुणे, २.रोहन समींदर कांबळे,वय १९ वर्षे,रा.संकेत विहार,काळेपडळ,हडपसर,पुणे ३.गणेश नंदू ससाणे,वय २४ वर्षे,रा.साई कॉलनी,काळेपडळ,हडपसर,पुणे ४.आर्यन अजय माने,वय-१९ वर्षे,रा.पापडे वस्ती, ढमाळवस्ती,भेकराईनगर, फुरसुंगी,पुणे ५.अजय साहेबराव गायकवाड,वय १९ वर्षे,रा.त्रिवेणीनगर,भेकराईनगर,फुरसुंगी,पुणे (अटक) व इतर दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०६/०७/२०२३ रोजी रात्रौ ००/२० वा.संविधान चौका जवळ,काकडे मैदान येथे आडबाजुस वानवडी,पुणे येथे |
| **तपशिल** | यातील नमुद इसमांनी संगनमत करून,मा.सह पोलीस आयुक्त,पुणे शहर यांचे पुणे पोलीस आयुक्तालयाचे क्षेत्रात शस्त्रे,सोटे,तलवारी,शारिरीक इजा करण्यासाठी वापरात येईल अशी कोणतीही वस्तु जवळ बाळगण्यास बंदी आदेश असताना,त्यांनी सदर प्रतिबंधात्मक आदेशाचा भंग करून,आपले कब्जात बेकायदेशीररित्या व अनधिकृतपणे लोखंडी सळईची कटावणी, मिरची पुड, लोखंडी पक्कड, स्क्रु ड्रायव्हर, कटर, लोखंडी हातोडी, दोन लोखंडी हत्यार इत्यादी घातक शस्त्रे तसेच ट्रान्सपरंट चिकट टेप, सुती पांढऱ्या रंगाची रस्सी,तीन मोबाईल,एक मोटार कार नं.MH/12/SU/3455 असा एकुण ४,६१,१२०/- रू किचा ऐवज बेकायदेशीररित्या आपले जवळ बाळगुन,हत्याराची व साथीदारांची जमवाजमव करून,दरोडा टाकण्याची पुर्ण तयारी करून,सदर भागात दहशत निर्माण करून,स्वतःचे आर्थिक फायद्यासाठी दरोडा टाकण्याचे तयारीत असताना आ.क्र.१ ते ५ हे मिळुन आले. |
| **त.अंमलदार** | वरिष्ठ पोलीस निरिक्षक,(अतिरिक्त कार्यभार), पतंगे ९८२२२२४९१२ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**